20 MAR 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेच्या अंतिम सहा संघांमध्ये विद्यापीठ

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १९ : सोळाव्या राष्ट्रीय युवा संसदेमध्ये देशभरातील विद्यापीठांमधून राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या अंतिम सहा संघांमध्ये शिवाजी विद्यापीठाची निवड झाली आहे. त्याबाबतचे संसदीय कार्य मंत्रालयाचे उपसचिव ए. बी. आचार्या यांचे पत्र नुकतेच विद्यापीठाला प्राप्त झाले आहे, अशी माहिती विद्यापीठ युवा संसद स्पर्धेचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी आज दिली.

केंद्र सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयामार्फत १६ वी राष्ट्रीय युवा संसद स्पर्धा शिवाजी विद्यापीठात २९ एप्रिल २०२२ रोजी झाली. संसदीय

> संसदीय कार्य मंत्रालयामार्फत देशभरातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये प्रत्येक वर्षी या स्पर्धेचे आयोजन केले जाते. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमधून सक्षम नेतृत्व विकसित होते. लोकशाहीची मूल्ये रुजविली जातात. यातून भारतीय संसदेचे कामकाज कसे चालते, याचे आकलन होते. कायदा पास करण्याची प्रक्रिया समजते. शिवाजी विद्यापीठाने या स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळवणे ही अतिशय गौरवाची बाब आहे. देशभरातील सहा संघांतून प्रथम क्रमांक मिळविण्यासाठी आपला संघ निश्चित प्रयत्न करेल.
>
> **- डॉ. प्रल्हाद माने**

कार्य मंत्रालयामार्फत समूह समन्वयक डॉ. एस. पी. सिंग, पाटणा (बिहार) आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ (लोणेरे) येथील डॉ. एस. बी. देवसरकार यांच्या परीक्षणाखाली आणि कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला.

या संसदीय युवा संसदेमध्ये शपथविधी, श्रद्धांजली, नवीन मंत्र्यांची ओळख, प्रश्नोत्तराचा तास, शून्य प्रहर, विशेषाधिकाराचा भंग, राज्यसभेतील संदेश, आयत्या वेळेचे विषय, बिल (कायदा) पारित करणे, आदी संसदीय कामकाजाचे मुद्दे घेतले होते. वंदना रंगलानी, आशिया जामदार, तेजस सन्मुख, प्रीती पाटील, स्नेहा मगदूम, प्रज्वल माळी, सद्दाम मुजावर, श्रेया म्हापसेकर यांना उत्कृष्ट संसदपटू पुरस्काराने सन्मानित केले. युवा संसद संघाचे कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी त्यांचे अभिनंदन केले.



**कोल्हापूर :** सोळाव्या राष्ट्रीय युवा संसदेमध्ये देशभरातील विद्यापीठांमधून राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या अंतिम सहा संघांमध्ये शिवाजी विद्यापीठाची निवड झाली आहे.

पुण्यनगरी

# मुंबईचे उपांत्य फेरीतील स्थान पक्के

## महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेमध्ये रविवारी सातव्या दिवशी मुंबई, नाशिक, परभणी आणि नांदेड संघांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळविले. मुंबई विद्यापीठाने आपले उपांत्य फेरीतील स्थान पक्के केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दोन्ही संघांना पराभवाचा सामना करावा लागला. शिवाजी विद्यापीठ-ब आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्यात झाला. या सामन्यात नांदेडने २८ धावांनी विजय मिळवला. सकाळचा दुसरा सामना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्यात झाला. हा सामना नाशिकने ८ गडी राखून जिंकला.

दुपारचा पहिला सामना वसंतराव नाईक महाराष्ट्र कृषी विद्यापीठ, परभणी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांच्यात झाला. हा सामना परभणी संघाने ७ गडी राखून जिंकला. दुपारचा दुसरा सामना शिवाजी विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ यांच्यात झाला. हा सामना मुंबईने १८ धावांनी जिंकला.

लोकमत

# मुंबई विद्यापीठाची उपांत्य फेरीत धडक

## कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेमध्ये मुंबई विद्यापीठाने उपांत्य धडक मारली.

मुंबई विद्यापीठाने शिवाजी विद्यापीठाचा १८ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना मुंबई संघाने २० षटकात ५ बाद १६८ धावा केल्या. उत्तरादाखल खेळताना शिवाजी विद्यापीठ संघास ८ बाद १५० धावांपर्यंत मजल मारता आली. हा सामना मुंबईने १८ धावांनी जिंकला.

दुसऱ्या सामन्यात शिवाजी विद्यापीठ(ब) संघास स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडकडून पराभव पत्करावा लागला. नांदेड संघाने ९ बाद १५३ धावांचे आव्हान ठेवले. विद्यापीठ (ब) संघास १८.२ षटकांत १२५ धावांपर्यंत मजल मारता आली. त्यामुळे हा सामना नांदेड संघाने २८ धावांनी जिंकला. तिसऱ्या सामन्यात आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा ८ गडी राखून पराभव केला. सोलापूर संघाने सर्वबाद १२३ धावा केल्या. नाशिक संघाने हा सामना २ गड्यांच्या मोबदल्यात पार करीत विजया मिळवला.

चौथ्या सामन्यात वसंतराव नाईक महाराष्ट्र कृषी विद्यापीठ संघाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचा ७ गडी राखून पराभव केला. लोणेरे संघाने ८ बाद १७३ धावा केल्या. परभणी संघाने हे आव्हान ३ गड्यांच्या मोबदल्यात १५.५ षटकांत १७७ धावा करीत परतविले.

लोकमत

# विज्ञान सप्ताहानिमित्त उपक्रम, प्रदर्शनाला प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त राजीव गांधी सायन्स अँण्ड टेक्नॉलॉजी कमिशन, राज्य शासन, महाराष्ट्र अकॅडमी ऑफ सायन्सेस, कोल्हापूर चॅप्टर आणि शिवाजी विद्यापीठातर्फे जीवरसायनशास्त्र, जैवतंत्रज्ञान, सूक्ष्मजीवशास्त्र, पर्यावरणशास्त्र तसेच कृषी रसायने व कीड व्यवस्थापन अधिविभागांमार्फत राष्ट्रीय विज्ञान सप्ताह विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

उपक्रमांतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन, विख्यात संशोधकांची व्याख्याने आयोजित करण्यात आली. यावेळी विविध अधिविभागांमार्फत 'ग्लोबल सायन्स फॉर ग्लोबल वेलबिईंग' या विषयावर निबंध स्पर्धा, पोस्टर व मॉडेल स्पर्धा आणि वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या.

या उपक्रमादरम्यान पुण्याच्या राष्ट्रीय पेशी विज्ञान केंद्राचे संशोधक डॉ. अविनाश शर्मा यांचे व्याख्यान झाले. शर्मा यांनी अंटार्क्टिका येथील त्यांच्या संशोधनाचे अनुभव विद्यार्थ्यांना सांगितले.

जैवतंत्रज्ञान विभागामार्फत निबंध स्पर्धेचे व अ‍ॅग्रो केमिकल अ‍ॅण्ड पेस्ट मॅनेजमेंट विभागाने वक्तृत्व स्पर्धेचे नियोजन केले. पोस्टर व मॉडेल प्रदर्शन-स्पर्धाही घेण्यात आल्या.

प्रदर्शनास विविध शाळांतील सुमारे ७५० विद्यार्थ्यांनी भेट दिली. जीवरसायनशास्त्र अधिविभागातही ऑनलाइन पद्धतीने ऑस्ट्रेलियन अकादमी ऑफ सायन्सेसचे अध्यक्ष डॉ. चेन्नुपती जगदीश आणि स्वीत्झर्लंड येथील लॅबोरेटरी ऑफ मोलेक्युलर इंजिनिअरिंग ऑफ फंक्शनल मटेरियल्सचे संचालक डॉ. मोहमद खाजा नाझिरुद्दीन यांचे व्याख्यान झाले.

जनसंपर्क कक्ष
20 MAR 2023 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्थानिक समिती ही विद्यापीठाचा आरसा

## एम. व्ही. गुळवणी : 'केएमसी'मध्ये प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : विद्यापीठाने घालून



दिलेल्या अटी व शर्ती महाविद्यालयांमध्ये पूर्ण केल्या आहेत की नाहीत याची शहानिशा करणे स्थानिक चौकशी समितीचे कार्य असून ही समितीच विद्यापीठाचा आरसा असते. असे मत विटा येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. एम. व्ही. गुळवणी यांनी केले.

यशवंतराव चव्हाण (केएमसी) महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित स्थानिक चौकशी समिती अध्यक्ष व सदस्य एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेत त्या तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. यावेळी प्राचार्या डॉ. अश्विनी मुडेकर, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, प्राचार्य डॉ. संजय सावंत, प्राचार्य डॉ. संजय पाटील आदी सदस्य प्रमुख उपस्थित होते. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी महाविद्यालयाचे संलग्णीकरण, नूतनीकरण व नैसर्गिक विस्ताराबाबत सविस्तर माहिती दिली. उपकुलसचिव विलास सोयम यांनी प्रास्ताविक केले. डॉ. भाग्यश्री पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्र. प्राचार्य डॉ. अरुण पौडमल आभार यांनी मांडले. दोनशेहून अधिक प्राचार्य व प्राध्यापक उपस्थित होते.



कोल्हापुरात शुक्रवारी केएमसी कॉलेजमध्ये कार्यशाळा झाली. या कार्यशाळेत दोनशेहून अधिक प्राचार्य व प्राध्यापक उपस्थित होते.

लोकमत

# चंद्रवदन नाईक इतिहास अभ्यास मंडळ अध्यक्षपदी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : अर्जुननगर येथील देवचंद महाविद्यालयाचे इतिहास विभागप्रमुख डॉ. चंद्रवदन नाईक यांची शिवाजी विद्यापीठ इतिहास अभ्यास मंडळाच्या अध्यक्षपदी नुकतीच निवड झाली आहे.



नाईक यांचे प्राथमिक शिक्षण इचलकरंजी येथे झाले असून एम.ए.मध्ये ते शिवाजी विद्यापीठात सर्वप्रथम आले होते. नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली तीन विद्यार्थी पीएच.डी. झाले असून एक विद्यार्थ्याने एम.फिल. पूर्ण केलेले आहे. आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये त्यांचे २४ हून अधिक शोधनिबंध प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांना जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आशिषभाई शाह, उपाध्यक्ष डॉ. तृप्तीभाभी शाह, खजिनदार सुबोधभाई शाह, प्र. प्राचार्य डॉ. पी. पी. शाह यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात यशवंतराव चव्हाण जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानप्रसंगी (डावीकडून) डॉ. भारती पाटील, इंद्रजित देशमुख, डॉ. नितीन माळी व डॉ. उमेश गडेकर उपस्थित होते.

# यशवंतराव चव्हाण काळाचे भान असणारे नेते

## इंद्रजित देशमुख; शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १९ : ज्येष्ठ नेते यशवंतराव चव्हाण काळाचे भान असणारे नेते आणि तळागाळातील प्रत्येकाला आपले वाटणारे व्यक्तिमत्त्व होते. महाराष्ट्रातील पंचायत राज व्यवस्थेचा उदय आणि त्यासाठी त्यांची धडपड यांचे प्रतिबिंब त्यांच्या तत्कालीन निर्णयप्रक्रियेवर उमटल्याचे दिसते. त्यांचा आदर्श घेऊन युवकांनी ग्रामीण विकासाचे स्वप्न पूर्ण करावे, असे मत माजी सनदी अधिकारी इंद्रजित देशमुख यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण अध्यासनातर्फे यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'यशवंतराव चव्हाण व स्थानिक स्वराज्य संस्था' या चर्चासत्रामध्ये ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते. देशमुख म्हणाले, 'आजच्या पिढीने यशवंतरावांची कामाची शैली, भ्रष्टाचारमुक्त कारभार आणि तळागाळातील माणसांप्रतीची तळमळ ही तत्त्वे आत्मसात करून वाटचाल करणे गरजेचे आहे. विशेषतः ग्रामीण भागात काम करत असताना यशवंतरावांच्या कार्यप्रणालीचा आदर्श घेण्याची आवश्यकता आहे. डॉ. शिंदे म्हणाले, 'ग्रामीण भागात काम करत असताना अगदी शेवटच्या माणसापर्यंत पोहोचण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांनी आत्मसात करावे.' शारदाबाई पवार अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील म्हणाल्या, 'स्थानिक स्वराज्य संस्थामधून स्त्रियांचे नेतृत्व तयार होणे अपेक्षित आहे. तसे झाल्यास भविष्यात ग्रामीण विकासाचा वेग वाढेल'.

डॉ. संतोष सुतार, कविता वड्राळे, सुधीर देसाई, वैशाली भोसले, गजानन साळुंखे, चेतन गळगे, अमोल मिणचेकर, मृणालिनी जगताप, दादा ननवरे, तानाजी घागरे, नीलम जाधव, परशुराम वडार, तेजश्री मोहरेकर उपस्थित होते. यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे प्रभारी संचालक डॉ. नितीन माळी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. ऊर्मिला दशवंत, मुनकीर मुजावर यांनी सूत्रसंचालन केले. उमेश गडेकर यांनी आभार मानले.

सकाळ

कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा

# मुंबई विद्यापीठाचा संघ उपांत्य फेरीत दाखल

कोल्हापूर, ता. १९ : महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत मुंबई विद्यापीठाने उपांत्य फेरीत प्रवेश केला. नाशिक, परभणी व नांदेड संघाने आपापल्या प्रतिस्पर्ध्यांना पराभूत केले, तर शिवाजी विद्यापीठाचे दोन्ही संघ पराभूत झाले. शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडांगणावर स्पर्धा सुरू आहे.

नांदेडच्या स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाने शिवाजी विद्यापीठ 'ब' संघावर २८ धावांनी विजय मिळवला. नांदेडने २० षटकांत ९ गडी गमावून १५३ धावा केल्या. अजमेर बिदला यांनी २४, शैलेश कांबळे यांनी नाबाद २० तर शिवाजी हंबर्डे यांनी नाबाद २७ धावा केल्या. शिवाजी विद्यापीठाकडून दीपक कांबळे, राजेश मुपडे व विशांत भोसले यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. प्रत्युत्तरादाखल शिवाजी विद्यापीठ-ब संघाला १८.२ षटकांत सर्व गडी गमावून १२५ धावापर्यंत मजल मारता आली. अभिजीत कोठावळेने ३५ धावा केल्या. नांदेडच्या राशिद शेख यांनी ५, तर शैलेश कांबळे यांनी ३ गडी बाद केले. राशिद शेख सामनावीर ठरले.

नाशिकच्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने सोलापूरच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचा आठ गडी राखून पराभव केला. सोलापूरने २० षटकांत १० गडी गमावून १२३ धावा केल्या. मुख्तार शेख यांनी ५५ धावा फटकावल्या. नाशिकच्या योगेश राऊत यांनी ३ तर मुकुंद मुळे यांनी २ गडी बाद केले. सोलापूरचे आव्हान नाशिक संघाने अवघ्या २ गड्यांच्या मोबदल्यात पूर्ण केले. राजेंद्र शहाणे यांनी ७६ व योगेश राऊत यांनी २५ धावा केल्या. योगेश राऊत सामनावीर ठरले.

परभणीच्या वसंतराव नाईक महाराष्ट्र कृषी विद्यापीठाने लोणेरेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठावर ७ गडी राखून मात केली. लोणेरे विद्यापीठाने ८ गडी गमावून १७३ धावा केल्या. संदेश जाभरे यांनी ४४, नीलेश भोईर ३३ व विनायक तवसाळकर यांनी २४ धावा केल्या. परभणीच्या मारुती शिळाले यांनी ३ तर माणिक ढेंगे यांनी २ गडी बाद केले. परभणीने १५.५ षटकांत तीन गडी गमावून १७७ धावा केल्या. माणिक ढेंगे यांनी नाबाद ५१, मनोज कराळे ४२ व धीरज पाथ्रीकर यांनी नाबाद ३७ धावा केल्या. माणिक ढेंगे सामनावीर ठरले.

मुंबई विद्यापीठाने शिवाजी विद्यापीठावर १८ धावांनी विजय मिळवला. मुंबईने १६८ धावा केल्या. त्यात अनिल घडसी यांच्या ४९ तर संजय पवार यांच्या ४१ धावांचा समावेश राहिला. शिवाजी विद्यापीठाकडून विश्वनाथ वरुटे व विनायक शिंदे यांनी प्रत्येकी दोन गडी तंबूत परतवले. शिवाजी विद्यापीठाला २० षटकांत ८ गडी गमावून १५० धावा करता आल्या. विश्वनाथ वरुटे याने २८, प्रसाद देसाई याने २२ धावा केल्या. मुंबईच्या विपुल खंदारे यांनी ४ तर श्रीकांत मोंडे यांनी २ गडी बाद केले. विपुल खंदारे सामनावीर ठरले.

तरूण भारत

# मुंबई विद्यापीठ उपांत्य फेरीत दाखल

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या महाराष्ट्र राज्यआंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेमध्ये शानदार खेळी करत मुंबई विद्यापीठाने रविवारी उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. तसेच नाशिक, परभणी आणि नांदेड संघांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवला आहे. शिवाजी विद्यापीठाच्या अ व संघांना आज पराभवाची चव चाखावी लागली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी झालेल्या पहिल्या सामन्यात शिवाजी विद्यापीठ-ब संघाचा नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने २८ धावांनी पराभव केला. या सामन्यासाठी प्रथम फलंदाजी करताना मराठवाडाने २० षटकांत ९ बाद १५३ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरादाखल खेळताना 'शिवाजी विद्यापीठ 'ब' संघाला १८.२ षटकात सर्वबाद १२५ धावाच करता आल्या. दुसऱ्या सामन्यात नाशिकच्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने सोलापूरच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठला ८ गडी राखून जिंकले. या सामन्यासाठी प्रथम फलंदाजी करताना होळकर विद्यापीठाने २० षटकांत १० बाद १२३ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरादाखल खेळताना आरोग्य विज्ञान विद्यापीठाने २ गड्यांच्या मोबदल्यात १२३ धावांचे आव्हान पार केले.

परभणीचे वसंतराव नाईक महाराष्ट्र कृषी विद्यापीठ व लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ यांच्यात तिसरा सामना झाला. हा सामना कृषी विद्यापीठाने ७ गडी राखून जिंकला. सामन्यासाठी प्रथम फलंदाजी करताना आंबेडकर विद्यापीठाने २० षटकांत ८ बाद १७३ धावा केल्या. प्रत्युतरादाखल खेळताना नाईक विद्यापीठाने ३ गडी गमावून १५.५ षटकात १७७ धावा ठोकून सामना जिंकला.

चौथ्या सामन्यात मुंबई विद्यापीठाने शिवाजी विद्यापीठ-अ संघावर १८ धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना मुंबई विद्यापीठाने २० षटकांत ५ बाद १६८ धावा केल्या होत्या. मात्र प्रत्युत्तरादाखल खेळताना शिवाजी विद्यापीठ संघाला २० षटकांत ८ बाद १५० धावांपर्यंतच मजल मारता आली. त्यामुळे या सघाला पराभव स्वीकारावा लागला.